महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन ज्ञापन क्रमांक–पोप्रमा-०९१६/प्र.क्र.६४३/पोल-७.

मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : २८ सप्टेंबर, २०१७.

विषय :- सिंदी, तालुका-सेलू, जिल्हा-वर्धा, येथे पोलीस कर्मचाऱ्यांसाठी प्रकार-२ ची १२ शासकीय निवासस्थाने यांचे बांधकाम करण्यास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

संदर्भ :- १) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१४/ प्र.क्र.४९/ १४/ विनियम, दिनांक ०५.०१.२०१५.

२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५.

३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांचे पत्र क्र. पोमसं/ २७-बी/ २८-बी-२/ पोस्टे.सिंदी-निवा.बांध.वर्धा/ ११९/ २०१६, दिनांक २९.०३.२०१६.

ज्ञापन-

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांनी सिंदी, तालुका-सेलू, जिल्हा-वर्धा, येथे पोलीस कर्मचाऱ्यांसाठी प्रकार-२ ची १२ शासकीय निवासस्थाने यांचे बांधकाम करण्याचा प्रस्ताव सादर केला आहे.

२. उक्त कामासाठी उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, सेलू, यांनी सन २०१५-१६ च्या जिल्हा दरसूचीनुसार तयार केलेले रु.२,७७,०९,०००/- इतक्या खर्चाचे अंदाज सादर केले आहे. उक्त खर्चाचे अंदाज कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, वर्धा व पोलीस अधीक्षक, वर्धा यांनी सांक्षाकित केले आहेत.

३. उक्त खर्चाचे अंदाज सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी तपासले आहेत व ते **रु.२८६.९४ लक्ष** असे सुधारित केले आहेत आणि प्रशासकीय मान्यता देण्यास सहमती दिली आहे.

४. त्या अनुसार, सिंदी, तालुका-सेलू, जिल्हा-वर्धा, येथे पोलीस कर्मचाऱ्यांसाठी प्रकार-२ ची १२ शासकीय निवासस्थाने यांचे बांधकाम करण्यासाठी **रु.२८६.९४ लक्ष** इतक्या खर्चाच्या अंदाजास, पुढील अटींवर, याद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे:-

१) बांधकामाचा नमुना नकाशा, मांडणी नकाशा आणि विस्तृत नकाशा यांना वास्तुविशारदाकडून मंजूरी घेऊनच काम सुरु करावे.

२) ढोबळ स्वरूपात धरण्यात आलेल्या तरतुदींबाबत विस्तृत खर्चाचे अंदाज मंजूर करुनच काम हाती घ्यावे.

३) प्रत्यक्ष काम करताना शासन निर्णय, पर्यावरण विभाग, क्र.इएनव्ही-२०१३/ प्र.क्र.१७७/तां.क.१, दिनांक १०.०१.२०१४, अनुसार कार्यवाही करावी.

४) खर्चाचे अंदाज अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडल, चंद्रपूर, यांनी साक्षांकित करावे.

५) काम सुरु करण्यापूर्वी जागेच्या मालकी हक्काबाबतची पूर्तता करुन घ्यावी.

६) निधी उपलब्ध झाल्याशिवाय बांधकामास सुरवात करु नये.

५. उक्त कामासाठी येणारा खर्च हा गृह विभाग--मागणी क्रमांक बी-१०, ४०७०, इतर प्रशासनिक सेवांवरील भांडवली खर्च, (००) ८००, इतर खर्च, (००)(०५) महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माणसाठी बांधकाम करणे, (४०७० ०१५१), ५३, मोठी बांधकामे, याखाली उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

६. हे ज्ञापन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.३३६/इमा-२, दिनांक ०३.१०.२०१६, अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. हे शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०१७०९२९११४६२४३८२९ असा आहे. हे ज्ञापन डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swapnil Gopal Borse

Digitally signed by Swapnil Gopal Borse
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=66835707253ff77ef0e333eb3ad582f9b876d443b2654088832e43dcad21c52a, cn=Swapnil Gopal Borse
Date: 2017.09.29 11:35:48 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर.
३) पोलीस अधीक्षक, वर्धा.

प्रत :-

१) अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडल, चंद्रपूर (*सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी दिलेल्या "Recapitulation Sheet" च्या प्रतीसह).*
२) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, वर्धा (*सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी दिलेल्या "Recapitulation Sheet" च्या प्रतीसह).*
३) जिल्हा कोषागार अधिकारी, वर्धा.
४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
५) कार्यासन अधिकारी (इमा-२), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) कार्यासन अधिकारी, वित्त विभाग (व्यय-७), मंत्रालय, मुंबई.
७) निवड फाईल (पोल-७).